नि. फौ. ख. क्र.३/२०२१ **निशाणी क्र.६०**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,**

नाव – शांताबाई आश्रुबा सोनवणे

वय – ७० वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – रा.दुकडेगांव, ता. वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.३.४५ वा. सुरुः**

**१.** घटना ही अंदाजे साडेपाच वर्षांपुर्वी दुकडेगाव गावातील माझ्या राहत्या घरी सकाळी ८.०० वा. घडलेली आहे. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ३ हे माझ्या घरी आले. त्यावेळी आरोपी नामे नईम हे मला असे म्हणाले की, तुझा जुना टी.व्ही कोठे आहे ? मी त्याला असे म्हणाले की, माझा माझा जुना टी.व्ही. तुला काय करायचा आहे. त्यानंतर नईमने चाकु काढला आणि माझ्या गळ्याला लावला आणि "कोठे आहे सांग" असे म्हणाला, मी तुला जिवे मारीन असे म्हणाला. त्यामुळे मी घाबरुन टी.व्ही. पलंगाखाली आहे असे सांगितले. त्यानंतर आरोपी क्र.२ आणि ३ यांनी पलंगाखालुन टी.व्ही. ओढला आणि आरोपी क्र.१ टी.व्ही. घेवुन गेला. जाताना नईम असे म्हणाला की, “कोणाला सांगितले तर जिवे मारीन". त्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी झाकडं पडल्यानंतर नईमने टी.व्ही. पुन्हा माझ्या घरी आणुन टाकला आणि मला असे म्हणाला की, “तु जर हे कोणाला सांगितले तर तुला जिवे मारीन".

**२.** त्यानंतर दुस–या दिवशी मी आरोपी क्र.३ रिझवाना हिला मी असे विचारले की, माझा टी.व्ही. उघडला कसा, जुने नटबोल्ट होते, नवे कसे काय आले. त्यावर रिझवाना मला असे म्हणाली की, माझ्या नव–याने टी.व्ही. उघडुन त्याचा फोटो कोणालातरी पाठविला आहे. रिझवाना मला असे म्हणाला की, हे जर कोणाला म्हणालीस तर तुला जिवे मारीन.

३. त्यानंतर सात ते दहा दिवसांनी माझी लेक नामे पुष्पा मुंडे आली त्यावेळी मी तिला घडलेली घटना सांगितली. त्यानंतर आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. आता मला दि.०८.१०.२०२० रोजीची तक्रार दाखविण्यात आली त्यावर माझा अंगठा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६१** देण्यात येतो. आता मला दि.०८.१०.२०२० रोजीचा छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझा अंगठा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६२** देण्यात येतो.

मी सर्व आरोपींना ओळखते, त्यापैकी आज रोजी  केवळ नईम न्यायालयात हजर असून उर्वरित गैरहजर आहेत.

<u>सरतपास पूर्ण</u>.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. उजगरे यांच्यामार्फत</u>**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, दुकडेगांव हे वडवणी पासून १० ते १२ किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुकडेगांव येथुन वडवणीकडे येण्यासाठी खाजगी वाहने उपलब्ध आहेत. दुगडेगावावरुन वडवणी येथे येण्यासाठी किती वेळ लागतो हे मला सांगता येणार नाही. दुकडेगावात किती घरे आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुकडेगावात ग्रामपंचायत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या पुर्व दिशेला कुंडलिक सोनवणे, महादु बडे, नारायण बडे आणि जालिंदर बडे यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या जवळपास बहाद्दुर शेख आणि मच्छींद्र बडे यांनी घरे आहेत. माझ्या घराच्या आसपास नजीर शेख, धर्मा शिंदे, नवनाथ कराड, बारीकराव कराड यांची घरे आहेत किंवा नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या गंगेकडुन भिवा कराड यांचे घर आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या समोर खालतं–वरतं म्हणजेच पुर्व–पश्चिम असा रस्ता आहे. हे मला माहिती नाही की, माझ्या घरासमोरच्या रस्त्यालगत दहा ते बारा घरे आहेत किंवा नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न झाल्यापासून मागील पन्नास वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून मी दुकडेगावात राहत आहे. वर नमूद उलटतपासामध्ये नमूद असलेल्या व्यक्तींसोबत माझे कोणतेही भांडण नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी दुकडेगाव गावाचे सरपंच अरुण आव्हाड हे होते. हे म्हणणे खरे आहे की, दुकडे गावाचे पोलीस पाटील नामे कुंडलिक आश्रुबा सोनवणे हा माझा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा आज रोजी सुद्धा दुकडे गावाचा पोलीस पाटील आहे.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, पुष्पा शिवाजी मुंडे ही माझी मुलगी असून ती मागील अनेक वर्षांपासून औरंगाबाद येथे राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी रामभाऊ मुंडे हे माझे जावाई आहेत. बळीराम संभाजी सोनवणे हे कोण आहेत हे मला माहिती नाही. घटनेच्या वेळी सर्व लोक आपआपल्या घरात होते किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

**प्रश्न** – घटनेच्या वेळी तुम्ही तुमच्या घरामध्ये असल्यामुळे तुमच्या घराबाहेर कोण उभे आहे हे  तुम्ही पाहिले नाही, हे म्हणणे बरोबर होईल काय ?

**उत्तर** – मी घराच्या बाहेर निघत नाही त्यामुळे मला माहिती नाही.

७. माझ्या मुलाकडे स्वतःचे खाजगी वाहन आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. कुप्पा गावामध्ये सरकारी दवाखाना आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. दुकडे गावापासुन कुप्पा हे गाव किती अंतरावर आहे हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी नोकरी करते. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली तेव्हापासून ते माझी मुलगी घरी येईपर्यंत मला काहीही दुखने नव्हते. स्वतःहुन सांगते की, मी सतत आजारी असते.

८. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमध्ये नमूद संपूर्ण मजकूर माझ्या मुलीने सांगितलेला आहे. वडवणी न्यायालयामध्ये माझी मुलगी पुष्पा मुंडे हिच्या विरुद्ध फौजदारी केस चालु आहे किंवा नाही हे मला माहिती नाही. माझ्या घरापासून एक घर सोडुन दुसर घर नईम यांचे आहे. माझे पती हयात होते त्यावेळी आमच्या कुटुंबाकडे ६० ते ६५ एक्कर जमीन होती किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. माझ्या पतीच्या हयातीत आमच्याकडे असलेल्या जमीनी आज रोजी विक्री केलेल्या आहेत किंवा नाही हे मला सांगता येत नाही. आमच्या कुटुंबाकडील चार ते पाच एक्कर जमीन नईमच्या वडीलांनी खरेदी घेतलेली आहे किंवा नाही हे मला सांगता येत नाही. नईमच्या वडीलांनी घेतलेल्या आमच्या जमीनीच्या कारणावरुन त्यांच्या आणि आमच्या कुटुंबामध्ये कुरबुर होती किंवा नाही हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीच्या वादाच्या कारणामुळे माझा मुलगा आणि मुलीच्या सांगण्यावरुन आरोपीविरुद्ध खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटा पुरावा दिला आहे.

<u>उलटतपास दु.४.२८ वा. पुर्ण.</u>

<u>फेरतपास नाही.</u>

**दिनांकः– २१/०४/२०२६.**

| | |
|---|---|
| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| Sd/– | Sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **वडवणी, जि. बीड.** | **वडवणी, जि. बीड.** |